महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे - १६
फोन नं. ०२०-२६१२२११९ Web : www.dhepune.gov.in Email : law.dhepune@nic.in

क्र. विधी-३४२५/प्र.क्र. ५७ (ई-१८९६३२७)/सीईटीसेल/ दिनांक : १४/०५/२०२५

**परिपत्रक -**

**विषय : उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील व्यावसायिक अभ्यासक्रम केंद्रीय प्रवेश प्रक्रिया शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता महाविद्यालय नोंदणी करणेबाबत.**

सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २८ अन्वये शासनास प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन शासनाने विधी ५ वर्ष, विधी ३ वर्ष, बी.एड., एम.एड., बी.पी.एड., एम.पी.एड., आणि बी.एड.-एम.एड. हे अभ्यासक्रम व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून अधिसूचित केलेले असून सदरहू अभ्यासक्रमाच्या प्रवेशाची नियमावली राजपत्रामध्ये प्रसिध्द केलेली आहे. त्यानुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून अधिसूचित केलेल्या अभ्यासक्रमांचे प्रवेश हे सक्षम प्राधिकारी म्हणून मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचेमार्फत होत आहेत.

सद्यस्थितीत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या राज्य सामायिक प्रवेश परीक्षेची कार्यवाही अंतिम टप्प्यात आलेली आहे. त्यानुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील केंद्रीय प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विधी ५ वर्षे, विधी ३ वर्षे, बी.एड., एम.एड., बी.पी.एड., एम.पी.एड., आणि बी.एड.-एम.एड. अभ्यासक्रमाच्या शासकीय / अशासकीय अनुदानित / अशासकीय अनुदानित अल्पसंख्याक/ विद्यापीठ संचलित/ विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित अल्पसंख्याक/ कायम विनाअनुदानित तत्वावर सुरु असणारी महाविद्यालये / विद्यापीठ विभाग यांनी सोबतच्या तक्ता क्र. १ मध्ये दर्शविण्यात आलेल्या संकेतस्थळावर त्यासमोर दर्शविण्यात आलेल्या कालावधीमध्ये ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करावी.

**महाविद्यालय नोंदणी बाबतच्या सूचना :**

१. अर्जामध्ये अचूक माहिती भरुन, सर्व कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे. अपलोड करण्यात येणारी कागदपत्रे वाचनीय असावीत.
२. माहिती भरुन आवश्यक कागदपत्रे अपलोड केल्यानंतर, सदरहू माहितीची व अपलोड केलेल्या कागदपत्रांची पुनश्च: एकदा फेरपडताळणी करुन सर्व तपशील बरोबर असल्याची खातरजमा करावी. तद्नंतरच अर्ज सबमिट करावा.

३. महाविद्यालय नावनोंदणीसाठी प्रति अभ्यासक्रम रु. १५००/- इतके शुल्क आकारण्यात येणार असून सदरहू शुल्काचा भरणा ऑनलाईन पध्दतीने करणे आवश्यक आहे.
४. महाविद्यालय नोंदणी प्रस्ताव संचालनालयास सादर करतेवेळी त्यासोबत पोर्टलवर सबमिट केलेल्या अर्जाची प्रत - प्राचार्यांची स्वाक्षरी केलेली असावी, पोर्टलवर अपलोड केलेल्या सर्व कागदपत्रांच्या सुस्पष्ट छायांकित प्रति जोडाव्यात.
५. सदरचा प्रस्ताव अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकापासून पुढील सात दिवसांच्या आत संचालनालयास प्राप्त होईल, अशा पध्दतीने पाठविण्यात यावा.
६. शासन निर्णय दि. १५.०७.२०२४ नुसार नावात बदल करणे, प्रवेश क्षमतेमध्ये सुधारणा करणे, महाविद्यालयाच्या पत्त्यामध्ये बदल करणे यांसारख्या बाबींसाठी शुल्क निर्धारीत करण्यात आलेले आहे. सबब, महाविद्यालयाचे नाव, पत्ता, प्रवेश क्षमता, तुकड्यांची संख्या यांसारख्या बाबींमध्ये महाविद्यालयाला बदल करावयाचा असल्यास त्याबाबतचा प्रस्ताव आवश्यक सहपत्रे व निर्धारित शुल्कासह संचालनालयास सादर करणे अनिवार्य आहे.

**शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून सुरु होणाऱ्या नवीन महाविद्यालयांना सूचना :**

i). शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून सुरु होणाऱ्या नवीन महाविद्यालयांनी प्रवेश प्रक्रिया पोर्टलवर नोंदणीकरिता युजर आयडी व पासवर्ड मिळणेसाठी संचालनालयास प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. सदरहू प्रस्तावासोबत संस्थेचे प्रमाणपत्र, अल्पसंख्याक संस्था असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र, महाविद्यालय मान्यता शासन आदेश, सदरहू शासन आदेशातील अटी व शर्तीची पुर्तता केल्याबाबतची कागदपत्रे, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता विद्यापीठाचे संलग्निकरणपत्र, आणि शासन निर्णय दि. १५.०७.२०२४ नुसार अभ्यासक्रमनिहाय शुल्क भरणा यांबाबतच्या कागपत्रांसह प्रस्ताव समक्ष सादर करावा.

ii). सदरहू प्रस्तावामध्ये संस्थेचे नाव, महाविद्यालयाचे नाव, महाविद्यालयाचा संपुर्ण पत्ता, महाविद्यालय ई-मेल आयडी, प्राचार्यांचे नाव, भ्रमणध्वनी क्रमांक, प्राचार्यांचा ई-मेल आयडी नमूद केलेला असावा.

iii). उक्त अ.क्र. i) मध्ये नमूद केलेली सर्व कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे. सदरहू कागदपत्रांशिवाय महाविद्यालय नोंदणीकरिता युजर आयडी व पासवर्ड उपलब्ध करुन देण्यात येणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

**शासन निर्णय दि. १५/०७/२०२४ नुसार शुल्क भरणा करणेबाबत :**

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील कायम विनाअनुदानित तत्वावरील व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये सुरु करणे, नवीन अभ्यासक्रम सुरू करणे, मंजूर प्रवेश क्षमतेत बदल करणे, महिला संस्थांचे को-एज्युकेशन मध्ये परिवर्तन करणे तसेच या उलट परिवर्तन करणे इ. बाबींसाठी शासन निर्णय दि. १५/०७/२०२४ अन्वये निश्चित केलेल्या शुल्काचा भरणा उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे येथे करणेसाठी खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

i). महाविद्यालयाने प्रत्येक अभ्यासक्रमासाठी स्वंतत्रपणे शुल्काचा भरणा करणे आवश्यक आहे. (उदा. एका महाविद्यालयात विधी ३ वर्ष आणि विधी ५ वर्ष असे अभ्यासक्रम नव्याने सुरू होणार आहेत, त्यावेळी दोन्ही अभ्यासक्रमासाठी स्वतंत्रपणे शुल्काचा भरणा करावा.)

ii). नोंदणी शुल्काचा भरणा धनाकर्षाद्वारे (Demand Draft) करणे आवश्यक असून, सदरचा धनाकर्ष "SBI A/C GRAS" या नावाने काढावा. (Payable at Pune)

iii). सदरहू धनाकर्षाच्या (Demand Draft) पाठीमागील बाजूस महाविद्यालयाचे नाव, पत्ता, अभ्यासक्रमाचे नाव व संपर्क क्रमांक लिहावा.

महाविद्यालयाद्वारे प्रवेश प्रक्रियेच्या पोर्टलवर आवश्यक कागदपत्रे अपलोड केली नसल्यास, आवश्यक कागदपत्रांअभावी संबंधित महाविद्यालयाचे नाव प्रवेश प्रक्रियेमध्ये समाविष्ट करण्यात येणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 14-05-2025 18:26:16

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य

प्रत -

१. प्राचार्य, सर्व विधी महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.
२. प्राचार्य, सर्व शिक्षणशास्त्र महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.
३. प्राचार्य, सर्व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.

प्रत माहितीस्तव सविनय सादर -

१. मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२.
२. मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, फोर्ट, मुंबई - ०१.

**तक्ता क्र. १**

| अ.क्र | अभ्यासक्रम | संकेतस्थळ | नोंदणी कालावधी |
|---|---|---|---|
| १. | विधी ५ वर्ष | https://llb5cap25.mahacet.org/ | दि. १५/०५/२०२५ ते ३०/०५/२०२५ |
| २. | विधी ३ वर्ष | https://llb3cap25.mahacet.org/ | |
| ३. | बी.पी.एड | https://bpedcap25.mahacet.org/ | दि. १९/०५/२०२५ ते ०५/०६/२०२५ |
| ४. | एम.पी.एड | https://mpedcap25.mahacet.org/ | |
| ५. | बी.एड. | https://bedcap25.mahacet.org/ | दि. २०/०५/२०२५ ते ०६/०६/२०२५ |
| ६. | एम.एड. | https://medcap25.mahacet.org/ | |
| ७. | बी.एड.-एम.एड. | https://bedmedcap25.mahacet.org/ | |

*****